
KHELO INDIA YOUTH GAMES


Government of Haryana
हरियाणा
GYMNASTICS
SBI
KHELO
TYKA


Ka
TYKA

...सत्ता

# संयुक्ता काळेला पाच सुवर्ण

## जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्समध्ये छाप; महाराष्ट्र पुन्हा अग्रस्थानी; ११ सुवर्णपदकांसह एकूण २० पदकांची कमाई

**वृत्तसंस्था, पंचकुला**

**ठाण्याच्या संयुक्ता** काळेने खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत तालबद्ध जिम्नॅस्टिक्समध्ये पाच सुवर्णपदकांची कमाई करत चमक दाखवली. या क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी चुणूक दाखवताना आतापर्यंत एकूण २१ पदके (सहा सुवर्ण, सात रौप्य, आठ कांस्यपदके) जिंकली आहेत. महाराष्ट्राने मंगळवारी ११ सुवर्णपदकांसह एकूण २० पदके कमावली. याच बळावर महाराष्ट्राने (२४ सुवर्ण, २२ रौप्य, १७ कांस्यपदके) हरयाणाला मागे टाकत (२३सुवर्ण, २० रौप्य, २९ कांस्यपदके) पुन्हा गुणतालिकेत अग्रस्थान प्राप्त केले आहे.

१६ वर्षीय संयुक्ताने तालबद्ध जिम्नॅस्टिक्समध्ये समाविष्ट असलेल्या रोप, हूप, बॉल, क्लब्स आणि रिबन प्रकारात सर्वोत्तम कामगिरी केली. निष्का काळेनेही रौप्यपदक पटकावत राज्याच्या पदकतालिकेत भर घातली.



**खेलो इंडिया** युवा क्रीडा स्पर्धा

ॲथलेटिक्समध्ये राज्याच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. उंच उडीत कोल्हापूरच्या अनिकेत मानेने (२.०७ मीटर) सुवर्णपदक पटकावले, तर रायगडच्या आर्यन पाटीलने (२.०४ मीटर) रौप्यपदक जिंकले. साताऱ्याच्या सुदेष्णा शिवणकरने १०० मीटर शर्यतीत सुवर्णकमाई केली, तर पुण्याच्या अवंतिका नरळेने रौप्यपदक मिळवले. ४ बाय १०० मीटर रीलेमध्ये दिग्विजय चौघुले, सार्थक शेलार, आर्यन कदम व आकाश सिंग या चौकडीने सुवर्णपदक जिंकले. प्रकारात महाराष्ट्राच्या मुलींच्या संघानेही सुवर्णपदक जिंकले. या संघात सुदेष्णा, साक्षी चव्हाण, अवंतिका, संजया सावंत यांचा समावेश होता.

सायकलिंगमध्ये केरीन प्रकारात मुलांमध्ये मंगेश ताकमोगेने आणि मुलींमध्ये पूजा दानोळेने रौप्यपदके पटकावली. कुस्तीमधील फ्रीस्टाईल प्रकारातील ५१ किलो वजनी गटात कोल्हापूरच्या नरसिंग पाटीलने सुवर्ण तर, रोहित पाटीलने रौप्यपदक मिळवले. मुलींच्या ४९ किलो वजनी गटात अहिल्या शिंदेने कांस्यपदक जिंकले, तर ६५ किलो वजनी गटात कोल्हापूरच्या शुभम पाटीलने सोनेरी कामगिरी केली. ७१ किलो गटात संकेत पाटीलने कांस्यपदक मिळवले.

मुंबईच्या दर्शन पुजारीने अंतिम सामन्यात तमिळनाडूच्या ऋत्विक संजीवला २१-१५, २२-२० असे सरळ दोन गेममध्ये पराभूत करत बॅडमिंटनमध्ये सुवर्णपदक प्राप्त करीत लक्ष वेधले.

## आनंदला गिरीने रोखले;

## दिया चितळेचा राष्ट्रकुल

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com

सकाळ

• Registered • Date of
आर.एन.आय. MAHMA

## खेलो इंडिया यूथ गेम्स : रिदमिक जिम्नॅस्टिक्समध्ये पाच पदकांवर मोहोर

# महाराष्ट्राच्या संयुक्ताची सुवर्णपंचमी

**पंचकुला, ता. ७ :** सर्वांत कठीण क्रीडा प्रकार म्हणून समजल्या जाणाऱ्या जिम्नॅस्टिक्समध्ये महाराष्ट्राच्या १६ वर्षीय संयुक्ता काळे हिने खेलो इंडिया युथ गेम्समध्ये ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली. मराठमोळ्या कन्येने रिदमिक जिम्नॅस्टिक्समध्ये पाच सुवर्ण पदकांवर मोहोर उमटवत उज्ज्वल भविष्याची चाहूल दिली.

सुरुवातीला टेनिस, फुटबॉल, क्रिकेट यांसारखे खेळ खेळल्यानंतर वयाच्या पाचव्या वर्षी संयुक्ता हिची पावले जिम्नॅस्टिक्सकडे वळली. खेलो इंडियामध्ये धडाकेबाज कामगिरी केल्यानंतर संयुक्ताचे लक्ष आता आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करण्याचे आहे. खेलो इंडिया यूथ गेम्समध्ये घवघवीत यश संपादन केल्यानंतर संयुक्ता म्हणाली, भारतीय संघात स्थान मिळवायचे आहे. त्यानंतर राष्ट्रकुल, आशियाई, जागतिक व पॅरिस ऑलिंपिक या अत्यंत महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये पदक जिंकण्याचे स्वप्न बघितले आहे, असेही ती आवर्जून म्हणाली.




**जिम्नॅस्टिकमध्ये पाच सुवर्णपदके मिळवणारी संयुक्ता काळे.**

### पदकांची लयलूट कायम

महाराष्ट्राच्या युवा खेळाडूंची पदकांची लयलूट मंगळवारीही कायम राहिली. अखेरचे वृत्त हाती आले तेव्हा महाराष्ट्राने १९ सुवर्ण पदकांसह एकूण ५६ पदकांची कमाई केली होती; मात्र अजूनही गतविजेता महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर विराजमान आहे. हरयाना २३ सुवर्णांसह एकूण ७२ पदकांसह पहिल्या स्थानावर कायम आहे.

### बॅडमिंटनमध्ये दर्शनचा पहिला क्रमांक

बॅडमिंटनमध्ये महाराष्ट्राच्या दर्शन पुजारीने (मुंबई) तमिळनाडूच्या ऋत्विक संजीवला दोन गेममध्ये हरवून सुवर्णपदकास गवसणी घातली. पहिला गेम त्याने २१ विरुद्ध १५ असा; तर दुसरा गेम २२ विरुद्ध २० या फरकाने जिंकला. ताऊ देवीलाल स्पोर्टस् कॉम्प्लेक्समध्ये बॅडमिंटन या खेळाचा अंतिम सामना रंगला. दर्शनच्या आक्रमक फटक्याचा ऋत्विकने तितक्याच लीलया प्रतिकार केला.

### कबड्डीत रौप्य, मुलांना ब्रॉंझ

कबड्डी या खेळामध्ये महाराष्ट्राला दोन पदके मिळाली. मुलींच्या गटात अंतिम सामन्यात पराभूत झाल्यामुळे महाराष्ट्राला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. हरयानाने महाराष्ट्राच्या मुलींना ४८-१९ अशा फरकाने हरवत सुवर्णपदक जिंकले. मुलांच्या गटात हिमाचल प्रदेशने सुवर्ण, हरयानाने रौप्य व महाराष्ट्र व उत्तर प्रदेश यांनी ब्रॉंझ पदक जिंकले.

### कुस्तीमध्येही पदके

कुस्तीमधील ५१ किलो फ्रीस्टाईल प्रकारात नरसिंग पाटील (सुवर्ण, कोल्हापूर), रोहित पाटील (रौप्य, कोल्हापूर) यांनी महाराष्ट्रासाठी मोलाची कामगिरी बजावली. या दोघांमध्येच शेवटची कुस्ती झाली. परिणामी महाराष्ट्राला एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक मिळाले. मुलींमध्ये ४९ किलो गटात अहिल्या शिंदेने ब्रॉंझ पदक जिंकले. ६५ किलो फ्रीस्टाईलमध्ये कोल्हापूरच्याच शुभम पाटीलने सुवर्ण पदक उंचावले. ७१ किलो गटात संकेत पाटीलने (कोल्हापूर) ब्रॉंझ पदकाची कमाई केली.

### देशाला पदक जिंकून देण्याची क्षमता

**महाराष्ट्र जिम्नॅस्टिक्स संघाचे प्रशिक्षक प्रवीण धागे यांनी संयुक्ताची स्तुती करताना म्हटले की, जिम्नॅस्टिक्स या खेळात खेळाडूंचा कस लागतो. रिदमिक जिम्नॅस्टिक्समध्ये दोरी, हूप, रिबन, चेंडू, क्लब्स यांचा समावेश असतो आणि या सर्वांमध्ये यश मिळवण्यासाठी चपळता आवश्यक असते. संयुक्तामध्ये अफाट गुणवत्ता आहे. इतर खेळाडूंचे प्रदर्शन तिच्या आजूबाजूलाही नव्हते. संयुक्तामध्ये देशाला पदक जिंकून देण्याची क्षमता आहे, असा विश्वास त्यांनी पुढे व्यक्त केला.**